वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

विद्यापीठाने निर्मिती केलेले सुधारीत व संकरीत वाणाबद्दल सर्व समावेशक व सविस्तर माहिती

अ.क्र.	तपशील		सविस्तर माहिती
१	पीक/वाणाचे नाव		कापूस : एनएचएच ७१५
२	प्रसारीत केल्याचे वर्ष		२०१७
३	प्रसारीत करणारी संस्था/विद्यापीठ		वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
४	जमीन		मध्यम ते काळी, खोल
५	हवामान		उष्ण ते समशीतोष्ण, उबदार
६	पेरणी/लागवडीचा कालावधी		कोरडवाहू : ७० - ८० मिमी पाऊस पडल्यानंतर (१५ जुलैच्या अगोदर)
७	प्रती एकर बियाणे		कोरडवाहू : १.२ - १.६ कि.ग्रॅ. प्रती एकर
८	पीक व्यवस्थापन		
	१	लागवडीचे/पेरणीचे व्यवस्थापन	बागायती लागवड २५ मे नंतर करावी तर कोरडवाहू लागवड मॉन्सूनचा ७० ते ८० मिमी. पाऊस पडल्यानंतर करावी. कापसाची लागवड १५ जुलैनंतर करू नये. **लागवडीचे अंतर :** बागायती - ९० X ९० सेंमी किंवा १२० X ९० सेंमी कोरडवाहू - ९० X ६० सेंमी
	२	खत व्यवस्थापन	बागायती - १००:५०:५० किग्रॅ नत्र, स्फुरद व पालाश / हेक्टर कोरडवाहू - ८०:४०:४० किग्रॅ नत्र, स्फुरद व पालाश / हेक्टर संपूर्ण स्फुरद व पालाश लागवडीच्या वेळी द्यावी. नत्राची मात्रा बागायतीमध्ये लागवडीच्या वेळी, १ व २ महीन्यानंतर अनुक्रमे २०%, ४०% व ४०% प्रमाणात द्यावे. कोरडवाहु लागवडीमध्ये नत्र लागवडीच्या वेळी व १ महीन्यानंतर प्रत्येकी ५० % या प्रमाणात द्यावे.
	३	पाणी व्यवस्थापन	बागायती लागवडीमध्ये पाऊस पडे पर्यंत जमिनीच्या मगदुरानुसार ८ ते १० दिवसाच्या अंतराने पाणी द्यावे. पीक वाढीच्या काळात पाऊसाचा खंड असल्यास पाते- फुले लागणे, बोंडे लागणे व बोंडे भरण्याच्या अवस्थेत पाणी द्यावे.
	४	कीड व्यवस्थापन	**रस शोषण करणाऱ्या किडी** (मावा, तुडतुडे व फुलकिडे) व्यवस्थापन - निंबोळी अर्क ५% किंवा असिटामिप्रिड २५ एसपी २ ते ४ ग्रॅम किंवा थायमिथॉक्झाम २५डब्ल्युजी २.५ ग्रॅम किंवा फ्लोनिकामीड ५० डब्ल्युजी ४ ग्रॅम पांढरी माशी – ट्रायझोफॉस ४० ई सी १६-२० मिली किंवा ॲसिफेट ७५ एसपी ३० ग्रॅम किंवा डायफेन्थ्युरॉन ५० डब्ल्युजी ८ ग्रॅम

			अळी : ठिपक्याची बोंडअळी, हिरवी बोंडअळी, शेंदरी बोंडअळी व पाने खाणारी अळी व्यवस्थापन- कार्बारील ५०% भुकटी ४० ग्रॅम किंवा प्रोफेनोफॉस ५० ईसी २० मिली किंवा थायोडीकार्ब ७५ डब्ल्युपी २० ग्रॅम किंवा स्पिनोसॅड ४५ एससी ४ मिली किंवा ईंडोक्झाकार्ब १४.५ ईसी १० मिली. कीटकनाशकाचे प्रमाण प्रती १० लीटर पाणी नॅपसॅक पंपासाठी. पावर स्प्रेअरसाठी प्रमाण ३ पट वापरावे.
	५	**रोग व्यवस्थापन**	दहिया- गंधक ३०० मेश भुकटी २० किग्रॅ / हेक्टर धुरळणी किंवा कार्बेन्डेझीम १० ग्रॅम प्रती १० ली. मर रोग- कॉपर ऑक्झीक्लोराईड २५ ग्रॅम प्रती १० ली. प्रमाणात आळवणी बुरशीजन्य करपा- सुडोमोनास फ्लुरोसन्स ०.२ टक्के फवारणी
९	**पिकाचा कालावधी**		१५०-१६० दिवस
१०	**उत्पादकता**		कोरडवाहू : १८ - १९ क्विं. / हे. (७.२ – ७.६ क्विं. / एकर)
११	**वाणाची वैशिष्ट्ये/विशेष गुणधर्म**		१) रस शोषण करणा-या किडींना सहनशील २) जीवाणुजन्य करपा तसेच पानावरील ठिपके (अल्टरनारीया) रोगास सहनशील
१२	**वाणासंबंधीचे छायाचित्रे**		